॥ सद्‌गुरु श्रीअनिरुद्ध ऋणज्ञापक स्तोत्र ॥

अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
चौऱ्याऐंशी लक्ष योनित फिरलो । शेवटी मानवाच्या जन्मासी आलो ॥
तरीही मी तुझ्या कृपेस पात्र झालो । अनिरुद्धा,तुझा मी किती ऋणी झालो ॥१॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
जन्मान्तरी मी किती पाप केले । या जन्मीही तेच गिरविले ॥
मज तू तरीही जवळी घेतले । अधमाधम मी तुझा भक्त झालो ॥२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
कधी न घडली सत्संग,सेवा । कधी न स्मरलो देवाधिदेवा ॥
कधी ना मिळाला जीवा विसावा । तुझ्या दर्शने मी सुखात न्हालो ॥३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मनुष्यदेही पशुचीच वृत्ती । सदैव दैत्यासम ही आसक्ती ॥
नाही विवेक,नाही विरक्ती । असा पतित मी तव नामेचि तरलो ॥४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
सदा प्रेयविषयी लोलूप झालो । श्रेयासी तेणे पराङमूख झालो ॥
असा शत्रु माझा स्वये मीच झालो । तवोपदेशे सावध आजि झालो ॥५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
रसातिलोलूप माझी ही रसना । कठोर बोलून दुखवी जनांना ॥
सदैव वदते असत्य वचना । तुझे नाम घेता वाक्‌शुद्ध झालो ॥६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मनात येती विकल्प नाना । वैषयिक गुंता सुटता सुरेना ॥
स्थैर्य आणि शक्ती, मना मिळेना । तुझे ध्यान करिता मनी समर्थ झालो ॥७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
वृथा चोच करुनि पोसले हे शरीर । काये न केले मी परोपकार ॥
किती भोगपंकात रुतलो गंभीर । तुझ्या चरणस्पर्शे आज मी उद्धरलो ॥८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥

कुतर्कयोगे मती भ्रष्ट झाली । यथासंचिते मी विपरीत झाली ॥
अतीचिकित्सेत ती व्यर्थ शिणली । तू ठेवता हात स्थितप्रज्ञ झालो ॥९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
बुद्धीच्या मदाने उन्मत्त झालो । वितंडवादात अडकूनी गेलो ॥
मीच तो शहाणा ऐसे समजलो । आज तव कटाक्षे अहंशून्य झालो ॥१०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
जोपासला मी किती अहंकार । विवेक विझला, दाटला अंधकार ॥
गुंता तमाचा विणला सभोवार । तुझ्या दिव्य तेजे प्रकाशी उजळलो ॥११॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
सेवा न घडली मातापित्यांची । दुरुत्तरे हृदये दुखवली मी त्यांची ॥
गाठली मी सीमा कृतघ्नतेची । असा कृतघ्न मी तव पायाशी आलो ॥१२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुवरिष्ठांस अवमानिले मी । आप्तेष्टमित्रांस निर्भत्सले मी ॥
स्वत:चेच म्हणणे केले खरे मी । असा दुष्ट मी तव दर्शनासी आलो ॥१३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
परदु:ख पाहुनी दाटला न उर । आले न माझ्या नयनात नीर ॥
किती निर्दयी मी होतो कठोर । तरी तुझ्या दयेच्या छायेत आलो ॥१४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
आहार,निद्रा,भय, कामी बुडालो । मी पुच्छविहीन पशूच बनलो ॥
फिरता फिरता तुझ्या दारी आलो । तुझ्या दारी येताच माणूस झालो ॥१५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
किती आधिव्याधी तू केल्यास शान्त । रक्षिलेस मजला घोर संकटात ॥
विसरलास ना मला तू अहोरात । स्मर्तृगामी बापू, दत्तगुरु ओळखलो ॥१६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
वाहे प्रेमगंगा तुझ्या महाद्वारी । नवस्वरात वाजे तुझी भक्तिबासरी ॥
अज्ञानछेत्रा तूच त्रिपुरारी । अनिरुद्धरुपे हरिहरास भेटलो ॥१७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥

तुला दोन पैसे देता मी सत्वर । तू नऊ रुपयांचा दिलास हार ॥
न कळे असा कसा बापू सौदागर । उलटी तुझी खूण हे मी समजलो ॥१८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
नावाचा योगींद्र पण मी करंटा । मजसाठी का तू सोसतोस तोटा ॥
खरोखर देवाहून सद्‌गुरुच मोठा । अकारण करुणा तुझी अनुभवलो ॥१९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
जसे चिडीच्या पायास दोर । बांधूनी आणिती तिजला समोर ॥
तसेच मज तू ओढले खरोखर । तुला काळजी माझी हे मी उमगलो ॥२०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझ्या प्राजक्तापुढे फिका कल्पवृक्ष । दे ठाव गुरुपदी, नको स्वर्ग रुक्ष ॥
तुझ्या पायी राहीन, नको मजसी मोक्ष । मला तू हवास, हेच मागण्यास आलो ॥२१|
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझे नाम गाऊ, कीर्तनात नाचू । तुझ्या चरितातील अमृतकण वेचू ॥
भवार्णव लंघूनि तुझ्या दारी पोंचू । तुझ्या नामनौकेत मौजेत बैसलो ॥२२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तू आणि मी बापु, मिळता स्वभावे । साहजिक अद्‌वैत घडूनी यावे ॥
अशक्य ते शक्य तूची घडवावे । तुझ्या अनंत लीला पाहण्यात रमलो ॥२३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
उठल्या कितीही विकल्पलहरी । विरुन जातील धरिता सबूरी ॥
पाय सद्‌गुरुचे सोडू नये तरी । गुरुपायी सारे उपाय लाधलो ॥२४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मी यत्‌न करीता मज उद्धारासाठी । उभे घेउनि बापू दुधाची वाटी ॥
किती बापू भक्तार्थ करती अटाटी । भक्तवत्सला तुज मी शरण आलो ॥२५॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
टेकता मी माथा तुझिया पायाशी । प्रेमे तू धरिसी मजला पोटासी ॥
जशी माय सांभाळी निजबालकासी । बापू जगदंबे, मी तुझा बाळ झालो ॥२६॥

अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
चमत्कार घडविसी असंख्य वेळा । परि तू राहसी नामानिराळा ॥
कोण जाणे तुझी अपरंपार लीला । जगद्‌गुरु कृष्णा, मी तुझा गोप झालो ॥२७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मनी स्थापिले भावसिंहासनास । पायघड्या म्हणूनि अंथरीला ध्यास ॥
प्रतिष्टीत व्हावे विनंती आपणास । बापू विराजीत होता सुखावलो ॥२८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
मदर्थ झटतो किती बापू माझा । योगक्षेम वाही वैकुंठराजा ॥
सांग कसा होऊ उतराई तुझा । स्मरुनी ऋणांना तुझी वहाण बनलो ॥२९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझी वहाण होण्यास माझाच स्वार्थ । सोपविता तुज मी भारचि समस्त ॥
पुरविला मद्‌हेत तू होऊनी मुदित । त्वत्कृपे स्वार्थात परमार्थ साधलो ॥३०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
सद्‌गुरु हा चंद्र असे पौर्णिमेचा । बाधे न क्षय ज्या कलादिकांचा ॥
सदा वर्षतो रस भक्तीसुधेचा । गुरुपूर्णचंद्राचा मी चकोर झालो ॥३१॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुपौर्णिमेची तिथी ही पवित्र । बरसावे गुरुऋण स्मरुनी नेत्र ॥
फिटे न गुरुऋण करु स्मरणमात्र । नित्य मी गुरुऋणी गुरुरंगी रंगलो ॥३२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुची कृपा हीच गुरुपुर्णिमा हो । प्रतिक्षणी आम्हा अनुभव लाहो ॥
गुरुच्या ऋणांचे अखंड स्मरण राहो । गुरुमाउलीच्या ऋणी मी बुडालो ॥३३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुदक्षिणा मी तुला देऊ काय । चराचर व्यापून उरती तुझे पाय ॥
माझे तरी काय तुझ्याशिवाय । तुझा मी तुझ्यातच समर्पीत झालो ॥३४॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
येई बा बापु,नको वेळ लावू । तुझ्या विरहाने व्याकुळला जीवू ॥
प्रेमे दोन अश्रू तुझ्या पायी वाहू । हे कृतज्ञतेचे तीर्थ मधुर प्यालो ॥३५॥

अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
अडाणी मी उपमा तुला काय देऊ । तुझे स्तवन कोणत्या शब्दात गाऊ ॥
त्यापेक्षा तुझे पाय धरुनी ठेवू । हेच एक आम्ही करुनी निमालो ॥३६॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
एक परवलीचा आमुचा असे शब्द । हृदयात आमुच्या असे एक साद ॥
आनिरुद्ध अनिरुद्ध हेच आम्हा ब्रीद । अनिरुद्ध म्हणता भागवती झालो ॥३७॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
आनिरुद्ध आनिरुद्ध आमुचा जपतपू । तुझे नाम घेता नासती षड्अरिपू ॥
ऐसा जनार्दन आनिरुद्ध बापू । आनिरुद्ध नामे अभयदान पावलो ॥३८॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
महायती तू महाप्राण बापू । महाविष्णू तू परमाशिव बापू ॥
जगदम्ब तू सद्गुरुतत्व बापू । सर्वत्र मी तुझे रुप पाहू लागलो ॥३९॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
कर्दळीवनीचा वटवृक्ष बापू । सद्गुरुस्थानीचा निम्बवृक्ष बापू ॥
सद्गुरुतत्वाचे प्राकट्य बापू । पटता तुझी खूण मी गहिवरलो ॥४०॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
बापू एक माझी विनंती परिसावी । गुरुचरणऋणी मज नित्य ठेवी ॥
कृपा सर्वांवर ऐशीच रहावी । मी गुरुकृपेचा याचक एक झालो ॥४१॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
तुझे वाक्य आमुचे महाकाव्य होवो । तुझे प्रेम चित्ती उसळूनी येवो ॥
मी तुझा, तु माझा, दाटो हा भावो । तुझ्या चरणांशी एकरुप झालो ॥४२॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
गुरुऋणज्ञापक हे स्तोत्र गाई । तो गुरुपदीचा रहिवासी होई ॥
अनन्यत्वे त्यास गुरुराज पाही । गुरुस्फूर्तीने मी सत्य तेच वदलो ॥४३॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
आनिरुद्ध स्वये ही स्तोत्रजाहनवी । भक्तोद्धारार्थ मन्मुखे वदवी ॥
योगीन्द्र हा दास अक्षरे गिरवी । गुरुचीच गरिमा गिरवीत गेलो ॥४४॥

अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥ अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो ॥

इति श्री सद्‌गुरुऋणज्ञापकस्तोत्र सम्पूर्णम् ।
सद्‌गुरु श्री अनिरुद्धार्पणमस्तु ॥
॥ शुभं भवतु ॥ ॥ शुभं भवतु ॥ ॥ शुभं भवतु ॥